25 SEP 2022
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'महाराणी जिजाबाई'तून कार्यावर प्रकाशझोत

## संयोगिताराजे छत्रपती : शिवाजी विद्यापीठात विजयाराणी पाटील यांच्या पुस्तकाचे प्रकाशन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : करवीरच्या छत्रपती जिजाबाई या छत्रपती ताराराणी यांच्या स्नुषा, त्यांनी कोल्हापूर राज्याचे संरक्षण केले. काही कुणबी यांना प्रशासनाची जबाबदारी दिली. त्यांनी सती बंदीचा कायदा केला. या कर्तृत्ववान महाराणी यांच्या कार्यावर प्रकाशझोत टाकण्याचे काम 'महाराणी जिजाबाई : कोल्हापूर राज्याच्या रक्षणकर्त्या' या पुस्तकाच्या माध्यमातून झाले आहे, असे प्रतिपादन संयोगिताराजे छत्रपती यांनी येथे केले.

येथील डॉ. विजयाराणी पाटील यांनी लिहिलेल्या या पुस्तकाच्या प्रकाशनाचा कार्यक्रम शिवाजी विद्यापीठातील शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासनातर्फे घेण्यात आला. त्यावेळी त्या बोलत होत्या.



शिवाजी विद्यापीठात बुधवारी 'महाराणी जिजाबाई : कोल्हापूर राज्याच्या रक्षणकर्त्या' या पुस्तकाचे प्रकाशन संयोगिताराजे छत्रपती आणि प्र-कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी डावीकडून विजयाराणी पाटील, रमेश जाधव, भारती पाटील उपस्थित होत्या.

### या पुस्तकाचे भाषांतर व्हावे

या पुस्तकाचे इंग्रजी आणि इतर भाषांमध्ये भाषांतर व्हावे. त्याद्वारे छत्रपती जिजाबाई यांचे कार्यकर्तृत्व सर्वदूर पोहोचेल, असे प्र-कुलगुरु डॉ. पाटील यांनी सांगितले.

अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील होते. महाराणी जिजाबाई यांच्या कार्य, इतिहासाबाबत फारशी माहिती उपलब्ध नव्हती. आता ती या पुस्तकाच्या माध्यमातून उपलब्ध झाली असल्याचे संयोगिताराजे छत्रपती यांनी सांगितले. अध्यासनाच्या समन्वयक डॉ. भारती पाटील यांनी पुस्तक प्रकाशनामागील भूमिका स्पष्ट केली. ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. रमेश जाधव यांनी डॉ. पाटील यांनी या पुस्तकाच्या माध्यमातून करवीर संस्थानाच्या इतिहासात मोलाची भर घातली आहे. ज्या विषयावर माहिती उपलब्ध नाही, त्या विषयावर पीएच.डी. करून त्यांनी धैर्य दाखवले असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार, ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सुनीलकुमार लवटे, डॉ. एस. एन. पवार आदी उपस्थित होते.

25 SEP 2022

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# परदेशात विद्यार्थ्यांच्या संशोधनाचा डंका

## शिवाजी विद्यापीठातील २४४ विद्यार्थी संशोधन आणि पीएच. डी. साठी रवाना : अत्याधुनिक सुविधांमुळे संशोधनाचा टक्का वाढला

**अहिल्या परकाळे**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील ४८ प्राध्यापकांनी संशोधनाच्या जागतिक क्रमवारीत टॉप टू पर्सेंटेजमध्ये नाव कमावले आहे. परिणामी ग्रामीण भागातील विद्यापीठाने नंबर वनचे संशोधन करून जगभर शिवाजी विद्यापीठाचे नाव सुवर्णाक्षरांनी कोरले आहे. ऐवढेच नव्हे तर विज्ञान विभागातील २४४ विद्यार्थी परदेशात संशोधन आणि पीएच. डी.साठी रवाना झाले. यामध्ये विद्यार्थीनींची संख्या उल्लेखनीय आहे, त्यामुळे ग्रामीण विद्यापीठाने 'लोकल टू ग्लोबल'पर्यंत प्रगती केल्याचे सिद्ध झाले आहे.



शिवाजी विद्यापीठातील हजारो विद्यार्थी परदेशात नोकरीसाठी आहेत, आपल्या कामाच्या जोरावर कोल्हापूरचे नाव त्यांनी मोठे केले आहे. विद्यापीठाने परदेशातील विविध विद्यापीठाशी शैक्षणिक करार करून प्राध्यापक व विद्यार्थी आणि अध्यापनातून ज्ञानाची देवाणघेवण सुरू ठेवली आहे. कोरिया, जपान, चीन, ऑस्ट्रेलिया, युरोप, अमेरिका, युके, फ्रान्स, साऊथ कोरिया, इंग्लंडसह अन्य देशात रसायन, भौतिकशास्त्र, नॅनो सायन्स ॲन्ड टेक्नॉलॉजी, बायोकेमेस्ट्री आदी विषयाचे विद्यार्थी संशोधन करीत आहेत ही गौरवास्पद गोष्ट आहे. काही विद्यार्थ्यांनी संशोधन करून तेथील कंपनीत उच्च पदावर कार्यरत राहण्याचा बहुमान मिळवला आहे. विद्यापीठाने संशोधनासाठी प्रोत्साहन दिल्याने पीएच. डी. साठी परदेशात जाण्याचा ओढा वाढला आहे. संबंधीत विद्यार्थ्यांनी आपल्या गुणवत्तेनुसार परदेशातील विद्यापीठांची शिष्यवृत्तीही मिळवली आहे. त्यामुळे विद्यापीठातील संशोधन गुणवत्तापूर्ण व समाजोपयोगी असल्याचे सिद्ध झाले आहे.

### आधुनिक संशोधनामुळे परदेशात जाण्याचा टक्का वाढला

शिवाजी विद्यापीठाने 'रिसर्च ॲन्ड इनोव्हेशन इको सिस्टिम' समृध्द केली आहे. विद्यार्थ्यांना प्रोत्साहन, योजना, विद्यावेतन आणि सुविधा दिल्या जातात. जागतिक दर्जाची प्रयोगशाळा, अत्याधुनिक उपकरणे उपलब्ध आहेत. त्यामुळे संशोधनासह परदेशी संशोधनासाठी जाण्याचा टक्का वाढला आहे. भविष्यात दर्जेदार संशोधन प्रकल्प आणण्याचा मनोदय असून, स्थानिक इंडस्ट्रीबरोबर सामंजस्य करार करून योजना प्रत्येक घटकापर्यंत पोहचवण्याचा मानस आहे.

**डॉ. प्रमोद पाटील (प्र-कुलगुरु, शिवाजी विद्यापीठ)**

विज्ञान विभागातील शेकडो विद्यार्थ्यांच्या संशोधनाचा फायदा अनेक औद्योगिक संस्थांना होवू लागला आहे. विद्यापीठातही अत्याधुनिक प्रयोगशाळा व उपकरणे उपलब्ध आहेत. पदवीपासूनच संशोधनाला प्रोत्साहन मिळत असल्याने पदव्युत्तर व त्यानंतरही संशोधक विद्यार्थ्यांची संख्या वाढत आहे. विद्यार्थ्यांचे आंतरराष्ट्रीय पातळीवरील जर्नलमध्ये संशोधन पेपर प्रसिद्ध झाले आहेत. तसेच अनेकांचे संशोधन पेटंट फाईलच्या अंतिम टप्प्यात आहे. त्यामुळे विद्यापीठातील विद्यार्थ्यांच्या संशोधनाचा लाभ समाजाला होतोय हे निश्चित.

### अधिविभागाचे नाव व विद्यार्थी संख्या

: रसायनशास्त्र ४०, भौतिकशास्त्र ५०, वनस्पतीशास्त्र ५, पर्यावरणशास्त्र ४, बायोकेमेस्ट्री ३०, तंत्रज्ञान अधिविभाग २५, नॅनो सायन्स ॲन्ड टेक्नॉलॉजी ५०, मायक्रोबायॉलॉजी २५, बायोटेक्नॉलॉजी ३०, प्राणीशास्त्र १०

### परदेशातील ३० विद्यार्थी शिवाजी विद्यापीठात घेताहेत शिक्षण

शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थी जसे परदेशात जातात तसेच परदेशातीलही विद्यार्थी शिवाजी विद्यापीठात शिक्षण घेत आहेत. सध्या ३० विद्यार्थी पदवी व पदव्युतरचे शिक्षण घेत असून त्यापैकी २ विद्यार्थी पीएच. डी. करीत आहेत.

पुढारी

# विद्यापीठाकडून ५०९ परीक्षांचे निकाल घोषित

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल २०२२ उन्हाळी सत्राच्या ७४७ अभ्यासक्रमांपैकी विद्यापीठ स्तरावरील ५६१ परीक्षा एमसीक्यू ऑफलाईन पद्धतीने झाल्या आहेत. २३ सप्टेंबर रोजी एम.ए. व एम.ए. (मास कम्युनिकेशन) विषयांचे निकाल जाहीर झाले. आजपर्यंत सुमारे ५०९ परीक्षांचे निकाल घोषित झाले आहेत.



शिवाजी विद्यापीठातून...

विद्यापीठाच्या ७४७ अभ्यासक्रमाच्या परीक्षा 'ओएमआर' उत्तरपत्रिकांचा वापर करून झाल्या आहेत. ओएमआर शीटवर विद्यार्थ्यांनी त्यांचा पीआरएन नंबर, बैठक क्रमांक, विषय सांकेतांक बद्दल माहिती चुकीची लिहिल्यामुळे संबंधित विद्यार्थ्यांच्या निकालामध्ये अनुपस्थित दाखवून निकाल घोषित झाले आहेत. अशा विद्यार्थ्यांचे निकाल सुधारित करण्यासाठी आवश्यक माहिती संकलन सुरू आहे. अधिविभाग, महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांची माहिती तत्काळ सादर करावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ अजितसिंह जाधव यांनी केले आहे.

पुढारी

# 'स्तुती' प्रशिक्षण कार्यक्रमाने संशोधक विद्यार्थी भावुक

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

भारत सरकारच्या 'स्तुती' प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये शिवाजी विद्यापीठात आयोजित 'स्तुती' कार्यक्रमाच्या निरोप समारंभाप्रसंगी देशभरातून आलेल्या विद्यार्थ्यांच्या डोळ्यांमध्ये आनंदाश्रू तरळले होते.

विद्यापीठाच्या सैफ सेंटरने सहावा 'स्तुती' प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केला होता. सात दिवसांत अनेक व्याख्यात्यांनी विविध विषयांवर व्याख्याने दिली. सहभागी विद्यार्थ्यांनी वैद्यकीयसह अन्य सुविधा पुरविल्याबद्दल आभार मानले. पन्हाळा येथे शैक्षणिक सहलीवेळी करवीर नगरीतील इतिहासाचा अभ्यास केला. स्पेस सायन्स सेंटर येथे वैज्ञानिक माहिती घेऊन विद्यार्थ्यांना आनंद झाला. जेनी गोसाई, निशा यादव, रितू चौधरी यांनी मनोगत व्यक्त केली. रिसर्च अँड इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट डिव्हिजन, डी. एस. टी. नवी दिल्लीच्या अध्यक्ष डॉ. प्रतिष्ठा पांडे यांनी उपक्रमाची माहिती मागवून घेतली आहेत. डॉ. आर. जी. सोनकवडे यांनी हा कार्यक्रम उत्तमरीत्या पार पाडला.

पुढारी

# एम.फिल., पीएच.डी. प्रवेश परीक्षेला १,२९९ विद्यार्थी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने एम. फिल., पीएच.डी.साठी शुक्रवारी प्रवेश परीक्षा झाली. १,८६४ पैकी १,२९९ विद्यार्थी परीक्षेला बसले.

ही प्रवेश परीक्षा शहाजी छत्रपती महाविद्यालय, मधुबाई गरवारे कन्या महाविद्यालय, सांगली व यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, सातारा या परीक्षा केंद्रांवर घेण्यात आली. दि. २२ सप्टेंबर रोजी १६६८ विद्यार्थ्यांपैकी ११६७ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. दि. २३ रोजी बिझनेस मॅनेजमेंट, इंग्रजी, बायो-टेक्नॉलॉजी, फूड टेक्नॉलॉजी, मायक्रोबायालॉजी, मेकॅनिकल इंजिनिअरिंग, हिंदी, फिजिक्स, संगीतशास्त्र आदी विषयांच्या परीक्षा झाल्या. दरम्यान, पदव्युत्तर अधिविभाग व संलग्नित महाविद्यालयातील पदव्युत्तर अभ्यासक्रमामधील रिक्त १५ अभ्यासक्रमामधील जागांसाठी २० सप्टेंबर रोजी पदव्युत्तर पुनर्परीक्षा झाली. ३०७ विद्यार्थी परीक्षेला उपस्थित होते.

तरूण भारत

# 'स्तुती' प्रशिक्षणाचे संशोधक विद्यार्थ्यांकडून कौतुक

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

केंद्राच्या स्तुती प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये दिल्ली, गुजरात, हैदराबाद, कर्नाटक, पंजाब, तमिळनाडू उत्तर प्रदेश आणि महाराष्ट्रातील संशोधक विद्यार्थी, शिक्षक सहभागी झाले. शिवाजी विद्यापीठमध्ये सैफ सेंटरने सहावा स्तुती प्रशिक्षण कार्यक्रम झाला. या सप्ताहभरातील प्रशिक्षणाची शुक्रवारी सांगता झाली. यावेळी संशोधक विद्यार्थ्यांनी या उपक्रमाचे कौतुक केले.



विद्यार्थ्यांनी नॅशनल केमिकल लॅबोरेटरी पुणे येथील शास्त्रज्ञांचे कुशल आयोजन, विद्यापीठातील सैफ सेंटरची उपकरणे, डॉ. सोनकवडे यांचे कौतुक केले. स्तुती कार्यक्रम डॉ. सोनकवडे यांना विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालयाने दिला आहे. डॉ. प्रतिष्ठा मांडे अध्यक्ष, रिसर्च अँड इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट डिव्हिजन, डी.एस.टी. नवी दिल्ली यांनी याची माहिती मागवून घेतली आहे. पन्हाळा येथील शिवाजी विद्यापीठाच्या स्पेस सायन्स सेंटर येथे जाऊन संपूर्ण वैज्ञानिक माहिती घेतली. त्यानंतर निरोप समारंभात विद्यार्थ्यांनी या उपक्रमाबद्दल भावना व्यक्त केल्या.